Office of The Divisional Forest Officer,
Mumbai Mangrove Conservation Unit
68-B, Kamgar Nagar,
Near Tilaknagar Station,
Kurla (E) - 400 024
Phone / Fax .022-25220097

महाराष्ट्र वन विभाग

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालय
ब-6 8 कामगार नगर
टिळकनगर स्टेशन जवळ,
कुर्ला पूर्व- 400 024.
Email:-dfommcu@gmail.com

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक- 643
दिनांक 22/05/19
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

विषय– KM -36 Mangroves Monitoring Committee Complaints.

जा.क्र. कक्ष- ०५/ ल.ले/ 340/2018-19
कुर्ला-४०० ०२४ दि.- 14/05/2019.

प्रति,
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष
तथा
सदस्य सचिव
मुंबई व मुंबई उपनगरे कांदळवन सनियंत्रण समिती

**संदर्भ**.- वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य मुंबई यांचेकडील पत्र क्र./ठा. खा.फ्ले.अ./53/2019-20 दि. 09.05.2019.

**महोदय**,

उपरोक्त संदर्भातीलउपरोक्त संदर्भातील कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीच्या बैठकीतील मुद्दा क्र.72 अन्वये श्री. अंकुश कुऱ्हाडे यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य मुंबई यांचेकडील पत्र या कालावधीत प्राप्त झालेले असून वनपाल यांनी दि. 09.05.2019 स्थळपहाणी केली असता राखीव कांदळवनात कोणत्याही प्रकारचा मोबाईल टॉवर उभारण्यात आलेला दिसून येत नाही. सदर मोबाईल टॉवर हा मुलुंड ऐरोली रस्त्याच्या बाजूला असल्याचे निदर्शनास आले.

सहपत्र- वरीलप्रमाणे.

(व्ही. आर. जगताप)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

**वनपरिक्षेत्र अधिकारी ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य ऐरोली यांचे कार्यालय**

सेक्टर 10, दिवा जेट्टी, डी.ए.वी. शाळे जवळ ऐरोली नवी मुंबई 400 708 rfommcell1@gmail.com

**विषय:-** हॅलो फॉरेस्टवर ऑनलाईन तक्रार क्र. KM36 दि. 04/05/2019 बाबत

**जा.क्र./ठा.खा.फ्ले.अ./**५३ **/सन २०१९-२०**

**दिनांक:** ०९ / ०५ / २०१९

**प्रति,**

मा. विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई.

संदर्भ:- वनपाल मुलुंड यांचेकडील जा.क्र. / १६ / २०१९-२० दि. ०९/०५/२०१९ रोजीचा अहवाल.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये हॅलो फॉरेस्टवर श्री. अंकुश कुऱ्हाडे यांनी मौजे मुलुंड सर्वे नं. ३५१ न.भु.क्र. १३१८ मुलुंड ऐरोली रस्ता पथकर येथे राखीव कांदळवनाच्या हद्दीत मोबाईल टॉवर उभारल्याची तक्रार दाखल केली असता त्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०९/०५/२०१९ रोजी वनपाल मुलुंड, वनरक्षक भांडूप, मुलुंड (अति. कार्यभार) व पंच यांच्या समावेत प्रत्यक्ष जागेवर जावून स्थळ पाहणी केली असता राखीव कांदळवनात कोणत्याही प्रकारचा मोबाईल टॉवर उभारण्यात आलेला दिसून येत नाही. सदरचा मोबाईल टॉवर हा मुलुंड ऐरोली रस्त्याच्या बाजूलाच उभारलेला आहे. मुलुंड ऐरोली रस्त्याच्या दोन्ही बाजूस मिठाघरामध्ये मिठ काढल्याचे दिसते व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचा पथकर वसुली टोलनाका आहे व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा जकातनाका असल्याचे दिसून येते. तेथील जागेचा स्थळ पंचनामा करून GPS रिडींग घेतले N 19°09'13.83" E-72°57'53.16" असे असून सदर क्षेत्राचे 2005 व 2019 चे Google नकाशे व MRSAC नकाशा सहपत्र सादर केला आहे.

**(एम. एस. बोठे)**
**वन परिक्षेत्र अधिकारी**
**ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य,**
**ऐरोली**

सोबत:- स्थळ पंचनामा, गुगल नकाशा व MRSAC नकाशा.

विषय:- हॅलो फॉरेस्टवर ऑनलाईन तक्रार क्र.
KM36 दि. 04/05/2019 बाबत.

वनपाल मुलूंड/जा.क्र./ 16 / 2019-20

दिनांक 09/05/2019

प्रति,

मा. वनपरिक्षेत्र अधिकारी,
ठाणे खाडी फ्लेमिंगा अभयारण्य,
ऐरोली

महोदय,

आपणास अहवाल सादर करतो की, दि. 04/05/2019 रोजी सायंकाळी 4.43 वा. हॅलो फॉरेस्ट ऑनलाईन तक्रार क्र. KM36 मोबाईल टॉवर उभारल्याचे तक्रार दाखल झाल्याने या कार्यालयात प्राप्त दि. 06/05/2019 रोजी वनरक्षक भांडूप, मुलूंड (अति. कार्यभार) व पंच यांच्या समावेत प्रत्यक्ष जागेवर जाऊन जागेची स्थळ पाहणी केली असता राखीव कांदळवनाच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचा मोबाईल टॉवर उभारलेला दिसून आलेला दिसून आला नाही. सदरचा मोबाईल टॉवर हा मुलूंड ऐरोली रोडलगत असल्याचे दिसून येते. तसेच मुलूंड व ऐरोली रस्त्याच्या दोन्ही बाजूस मिठाघरामध्ये मिठा काढल्याचे दिसते व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे कार्यालय व पथकर वसुली शेड असल्याचे दिसते. बृहन्मुंबई महानगरपालिका यांचा जकात नाका आहे. तेथील जागेचा स्थळ पंचनामा करुन GPS रिडींग घेतले N 19°09'13.83" E- 72°57'53.16" असे असून सदर क्षेत्राचे 2005 व 2019 चे Google नकाशे व MRSAC नकाशा सहपत्र सादर केला आहे.

वनपाल, मुलूंड
ठाणे खाडी फ्लेमिंगा अभयारण्य,
ऐरोली

पंचनामा दि० 9|5|2019

1) श्री. परमेश्वर सदाशिव चौधरी वय-32
रा. ऐरोली

2) श्री. हेमंत छबिलदास पटेल वय-34
रा० मुलुंड.

आम्हा पंचांस वनपाल मुलुंड, वनरक्षक मुलुंड मुलुंड, यांनी मुलुंड ऐरोली टोल नाका जवळ मोबाईल टॉवर स.नं. 349 पै. न.भू.क्र. 1398 पै. येथे पंचनामा करणेकामी बोलविल्या वरुन आम्ही पंच स्वेच्छे एकत्र जमून जागेवरची सत्य परिस्थितीची पहाणी करुन पंचांस लिहून देत आहोत ते खालील प्रमाणे.

आम्ही पंच आज दि. 9|5|2019 रोजी मौजे मुलुंड स.नं. 349 पै. न.भू.क्र. 1398 ऐरोली टोल नाका मोबाईल टॉवर जवळ वनाधिकारी यांच्या समवेत उभे असून, वनाधिकारी यांनी त्यांच्याकडील हॅलो फॉरेस्ट वर तक्रार दाखल झाल्याने तक्रार क्र. KM. 36 दि. 4|5|2019 या कार्यालयात प्राप्त दि. 6|5|2019 झाली असून त्या अनुषंगाने वनाधिकारी यांच्याजवळ असलेल्या नकाशा व मालमत्ता कर उघडून आम्हां पंचांस दाखविल्या तक्रारदार श्री. अंकुश कुरडे यांच्या तक्रारी प्रमाणे मोबाईल टॉवरचे स्थळ जागेची पहाणी केली असता कारखान्याच्या हद्दीच्या बाहेर असून मुलुंड ऐरोली रस्त्याच्या बाजूला आहे. कारखान्यात कोणत्याही प्रकारच्या मोबाईल टॉवर दिसून आला नाही.

सदर रस्त्याच्या दोन्ही बाजूस मिठ

काढल्यानंतर दिसून येते व टोल नाका क्र.का.८
क्रमांकाचा नाका आहे. या ठिकाणी कारवंबाची
लोड करून मोबाईल टॉवर बांधलेल्या नाकी.
त्या नंतर G.P.S रिडिंग घेतले असून.
ते या प्रमाणे आहे.

① N- 19 13:83 E 072 57 53:16.

हा पंचनामा आम्ही पंचांनी सांगि
तल्या प्रमाणे बरोबर असून, त्याची खात्री
केल्यावर आम्ही पंच अक्षरी सह्या केल्या
सदरचा पंचनामा सकाळी ११:०० वा.
चालू करून १२:००: वा. पूर्ण करण्यात आला.

ठिकाण - मुंब्रा ठेरोली टोल नाका.

दि० ९/५/२०१८

पंच

१) परमेश्वर सदाशिव चौधरी
P.S. [signature]

२) हेमंत छोटूलाल पटेल
Hpatel

समक्ष
[signature]

[signature]
पो.नि. [illegible]